**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक १६ मे २०२४**

**ठळक बातम्या**

- **मुंबईतील घाटकोपरमध्ये जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १६, बचावकार्य पूर्ण.**
- **अंबाझरी धरण बळकटीकरणाची कामे पावसाळ्यापूर्वी गतीने पूर्ण करण्याचे विभागीय आयुक्तांचे निर्देश.**
- **मान्सून ३१ मे च्या सुमारास केरळमध्ये होणार दाखल- हवामान विभागाचा अंदाज.**

- **नागपूरात आंबा -तृणधान्य महोत्सवाला तसंच विद्यापीठाच्या उन्हाळी क्रीडा शिबिराला उत्साहात सुरुवात.**

*****

घाटकोपर दुर्घटना /बचावकार्य

मुंबईतल्या घाटकोपरमध्ये छेडानगर परिसरात महाकाय फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतलं बचावकार्य आज सकाळी साडेदहा वाजेदरम्यान संपवण्यात आलं. मुंबई महापालिका आयुक्त भुषण गगराणी यांनी आज पत्रकारांशी बोलतांना ही माहिती दिली. जवळपास ६३ तास चाललेल्या या बचावकार्यात ९१ जणांना सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आलं. सध्या या ठिकाणचा मलबा हटवण्याचं काम सुरु आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित पेट्रोल पंपाच्या अनुषंगाने फलकासंदर्भातल्या परवानग्या तपासण्यात येत असल्याचं ते यावेळी म्हणाले. १३ मे रोजी झालेल्या या दुर्घटनेत आतापर्यंत १६ जणांचा मृत्यू झाला आहे.

शरद पवार/उद्धव ठाकरे

देशाच्या प्रमुखाची जबाबदारी सर्व जाती धर्मांना एकत्र ठेवण्याची आहे. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विधानं ऐक्याला अडचणीत आणणारी असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला. नाशिकमधल्या वणीमध्ये ते काल प्रचारसभेला संबोधित करत होते. त्याचप्रमाणे नाशिकच्या कांदा निर्यातीला बंदी आणि गुजरातच्या कांद्याला सूट असे दुहेरी धोरण राबविताना राज्यातले अनेक उद्योग गुजरातला नेल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. नाशिक शहरात काल आयोजित प्रचारसभेत ते बोलत होते. भ्रष्टाचाराचे आरोप सत्ताधाऱ्यांनी आमच्या सरकारवर केले. मात्र निवडणूक रोखे हा सर्वात मोठा घोटाळा असून यावर खुली चर्चा करण्याचं आव्हान त्यांनी सत्ताधाऱ्यांना दिलं.

सेव्हन वंडर प्रकल्प अवैध

नागपूरकरांनी गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये महापूर अनुभवला तरी पुन्हा महामेट्रोने अंबाझरी परिसरात "क्रेझीकॅसल" च्या जागेत "सेव्हन वंडर्स" नावाचा प्रकल्प अवैध पद्धतीने उभारण्याचे काम सुरु केले आहे. या प्रकल्पासाठी महामेट्रोने कुठलीही परवानगी घेतली नसून प्रकल्पाचे  बऱ्यापैकी काम पूर्णही होत आलं आहे. त्यामुळे यंदा पुन्हा जोरदार पाऊस आला तर हजारो घर पुन्हा पाण्याखाली जाऊ शकतात. त्यामुळे या विरोधात नागपूर शहर  काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आणि आमदार विकास ठाकरे यांनी विभागीय आयुक्तांकडे पत्राद्वारे तक्रार नोंदविली आहे. हा प्रकल्प पूर्णपणे नाग नदी पात्रातच असल्यामुळे हा प्रकल्प पूर्णपणे अवैध आहे. या अवैध बांधकामाला शह देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली नाही तर, नागपूरकरांच्या सुरक्षितेसाठी न्यायालयात जाणार असल्याचा इशाराही यावेळी ठाकरे यांनी दिला आहे.

अंबाझरी धरण बळकटीकरण

अंबाझरी धरणाच्या बळकटीकरणासाठी आवश्यक सर्व कामे पावसाळ्याआधी गतीने पूर्ण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी काल  दिले.अंबाझरी धरणाच्या बळकटीकरणासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत उच्चस्तरीय समितीची सहावी बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या. अंबाझरी धरणाच्या बळकटीकरणासाठी हाती घेण्यात आलेली कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी विविध यंत्रणांच्या समन्वयाद्वारे समितीने सुरक्षेच्याद‍ृष्टीने  उपाययोजनांना केल्या आहेत. यानुसार पहिल्या टप्प्यातील कामानंतर दुसऱ्या टप्प्याअंतर्गत या धरणाच्या जवळपास ४२ हजार क्युबिक मिटरवर मातीबांध बळकटीकरणाची कामे अंतिम टप्प्यात असून ही कामे पावसाळयाआधीच पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी बिदरी यांनी जलसंपदा विभागाला दिले. अंबाझरी धरणाच्या सांडव्यावरून  वाहणारा विसर्ग व्यवस्थितरित्या वाहून जाण्यासाठी नवीन पूल बांधण्याचे काम सुरु झाले आहे. पुलाचे बांधकाम करतांना वीज वाहिन्यांची कामे सार्वजनिक बांधकाम विभाग व महावितरण यांनी समन्वयाने पूर्ण करावीत. ही कामे पावासाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या दिशेने नियोजन करावे. याठिकाणी वाहतूकीच्याद‍ृष्टिने उपाययोजना करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

डेंग्यू दिवस

राष्ट्रीय डेंग्यू दिवस आज पाळला जात आहे. त्यानिमित्त आज आरोग्य विभागाच्या वतीनं विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. डेंग्यु संदर्भात इंडिया फाईटस डेंग्यू हे मोबाईल ॲप्लीकेशन तयार करण्यात आलं असून या ॲप्लिकेशनचा नागरिकांनी वापर करावा,असं आवाहन संबंधित यंत्रणेने केलं आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या 25 वर्षांच्या प्रवासात नागपुरातीलच नव्हे तर विदर्भातील अनेक नगरपालिकांच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना प्रशिक्षण आणि अभ्यासक्रमांच्या माध्यमातून मोठा लाभ झाला असल्याचे कौतुकोद्‌गार नागपूर महानगरपालिकेच्या ई गव्हर्ननन्सचे संचालक आणि सहाय्यक आयुक्त महेश धामेचा यांनी काढले.15 मे 1999 रोजी नागपूरमध्ये स्थापन झालेल्या अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचा 25 वा वर्धापन दिन हर्णे महिला समाजाच्या सभागृहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

रेल्वे निरीक्षण

नागपूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक मनीष अग्रवाल यांनी काल रेल्वे ऑपरेशन्स आणि पायाभूत सुविधांच्या विकासाची सुरक्षा आणि कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी विविध प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून सर्वसमावेशक निरीक्षण केलं. यात चितोडा स्थानक, हिंगणघाट गुड्स शेड यांचा समावेश आहे. हिंगणघाट इथल्या तिसऱ्या मार्गावरील कामाच्या प्रगतीचा आढावा हा देखील निरक्षणचा महत्त्वाचा भाग होता.

लोकनिर्णय महाराष्ट्राचा

‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण दक्षिण - मध्य मुंबई लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात या वेळेत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

आंबा, तृणधान्य आणि धान्य महोत्सव

नागपूर शहरात आंबा, तृणधान्य आणि धान्य महोत्सवाचं आयोजन आज पासून अर्थात, १६ ते १९ मे दरम्यान करण्यात आलं आहे. महाराष्ट्र कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालयामार्फत, उत्तर अंबाझरी मार्गावरील कुसुमताई वानखेडे भवन इथं हा महोत्सव होत आहे. या महोत्सवामध्ये सहभागी उत्पादकांचे ४० ते ५० स्टॉल्स असणार आहेत, ज्याद्वारे उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री करण्यात येईल. सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत प्रदर्शन आणि विक्री सुरू राहील.

क्रीडा परिचय नि:शुल्क उन्हाळी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुढाकाराने तरंग फाऊंडेशनच्या वतीने क्रीडा परिचय नि:शुल्क उन्हाळी शिबिराला काल पासून सुरुवात झाली आहे. येत्या ३० मे पर्यंत रवी नगरातील विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात सायंकाळी ५.३० ते ७.३० वाजे पर्यंत हे शिबिर चालणार आहे. या शिबीरात ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, योगासने, मार्शल आर्ट, जिम्नॅस्टिक, बास्केटबॉल, टेबलटेनिस या खेळाचे प्रशिक्षण नवोदित व इतर खेळाडूंना मिळणार आहे. यात ५ ते १५ वर्षे वयोगटातील सुमारे ८० ते १०० खेळाडू सहभागी झाले आहेत. प्रत्येक खेळाच्या सत्रानंतर खेळाडूंना पोषक आहार तसेच शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्तीबाबत माहीती दिली जात आहे.

मॉन्सून /हवामान

नैऋत्य मौसमी पाऊस ३१ मे च्या सुमारास केरळात दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. गेल्यावर्षी ८ जून रोजी मान्सून केरळात आणि ११ जून रोजी महाराष्ट्रात आला होता. हवामान विभागाच्या यंत्रणेनुसार यंदा २८ मे ते ४ जून दरम्यान हा पाऊस दाखल होईल. दक्षिण अंदमानमध्ये येत्या रविवारपर्यंत मान्सून येण्याची शक्यता हवामान खात्यानं यापूर्वीच वर्तवली आहे. पश्चिम विदर्भात बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशीम या जिल्ह्यांमध्ये  आज आणि उद्या जोराचे वारे, वीजा, गारपीटींसह हलक्या ते  मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. पूर्व विदर्भात गडचिरोली इथं देखील आज असाच इशारा देण्यात आला आहे. नागपूर सह  उर्वरित पूर्व विदर्भात मात्र हवामान कोरडं राहणार आहे. गेल्या २४ तासात सर्वाधिक तापमान वाशीम इथं ४१ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सियस इतका नोंदविण्यात आलं. दरम्यान, नुकतेच वादळी वारा आणि ढगाळ वातावरणानंतर नागपुरात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. गडचिरोली जिल्ह्यातही अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस पडल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीनी दिली आहे.

नैसर्गिक आपत्ती

नागपूर जिल्ह्यात मान्सूनचे स्वरुप आणि  यात होणारे बदल लक्षात घेता कोणत्याही स्थितीत जीवित वा वित्तीय हानी होऊ नये यासाठी सर्व विभाग प्रमुखांनी इतर विभागाशी परस्पर समन्वय ठेवून योग्य ते नियोजन आणि दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन इथं आपत्ती व्यवस्थापन मान्सूनपुर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. हवामानाचा अंदाज आणि शासनाने वेळोवेळी केलेले आवाहन लक्षात घेऊन खबरदारी घेतल्यास नैसर्गिक आपत्तीत होणाऱ्या या हानीला आपल्याला रोखता येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्ह्यात सुमारे 157 पूरप्रवण गावं  असून

सर्वाधिक 34 गावं ही सावनेर मध्ये आहेत. त्या खालोखाल कामठी-22, मौदा-20, नरखेड-17, हिंगणा-13 आणि इतर गावं उर्वरित तालुक्यातील आहेत. जिल्ह्यातील नदी नाल्यांची संख्या व स्थिती लक्षात घेता ग्रामपातळीपासून तालुका पातळीवरील तहसील, पंचायत समिती, तालुका रुग्णालय यांच्यासमवेत जिल्हा पातळीवरील सर्व संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयावर भर द्यावा, असं जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी सांगितलं.

अस्वल हल्ला

गडचिरोली जिल्ह्याच्या कोरची तालुक्यातील खसोळा इथल्या जंगलात तेंदूपानं तोडणारा १४ वर्षांचा मुलगा अस्वलानं केलेल्या हल्ल्यात जखमी झाला आहे. त्याला कोरचीच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

*****